महाराष्ट्र शासन

# राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ईमेल : maharashtra.cetcell@gmail.com

क्र-वैशिप्र-१०१९/प्र.क्र. ०१२/सीईटी/नीट-पीजी १९/विदेशी पदवी/प्रवेशाबाबत/५२३ दिनांक ०१/०३/२०१९

प्रति,
मा.सचिव,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
मंत्रालय, मुंबई

विषय - सार्वजनिक आरोग्य विभागात विदेशातील पदवी धारक वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवांतर्गत नीट पीजी प्रवेशाबाबत...

संदर्भ - १. सहसंचालक (अवप्र), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. संआसे/पीजी सेल/सेवांतर्गत/पीजी/विदेश पदवी अर्ज स्विकार/ ३७४९/१९, दिनांक २८/०२/२०१९

२. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र संवैशिवस/ आसेसंमुं/नीट पीजी १९/सेवांतर्गत/पात्रता/२-अ, दिनांक ०१/०३/२०१९

महोदय,

कृपया उपरोक्त संदर्भ क्र. १ व २ च्या पत्राचे अवलोकन व्हावे.

सदर दोनही पत्रामध्ये सेवांतर्गत उमेदवारांनी विदेशी विद्यापीठाची पदवी प्राप्त केली आहे अशा उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पदव्युत्तर पदवीच्या संकेतस्थळावर भरता येत नाहीत, अशा आशयाचे पत्र दिलेले आहे.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने वैद्यकीय शिक्षण विभागाव्दारे मान्य करुन दिलेल्या माहिती पुस्तिकेचा अभ्यास केला असता त्यात सेवांतर्गत उमेदवारांच्या नीट पीजी प्रवेशाबाबत खालील तरतुदी आहेत.

8.1 **Eligibility for In-Service Candidates:**

8.15.1 Eligibility for in-Service candidates will be as per criteria laid down by the Public Health Department of State of Maharashtra for In-service medical officers. As per Public Health Department Government Resolution No. MMO-1910/466/C.R.411/10/Service-3, dated 3/5/2011 and or any Government Resolution issued from time to time **(Annexure-U)**

8.15.2 In–Service candidate desirous to claim In-Service quota seat shall obtain No Objection Certificate from their establishment for admission process.

8.15.3 In service quota candidate must have appeared for NEET-PG 2019, and declared eligible by Competent Authority, Government of India, New Delhi.

8.2 Candidates for post-graduate medical courses shall be selected strictly on the basis of their NEET-PG 2019 merit. However as per clause 9 (IV) & (VII) of MCI PG regulation 2000 in determining the merit of eligible In-Service candidates under Government/Public authority, weightage in the marks may be given by Public Health Department as an incentive at the rate of 10% of marks obtained for each year of service in remote and/or difficult areas maximum of 30% of marks obtained in NEET-PG 2019. The remote and difficult areas shall be as notified by Government of Maharashtra from time to time.

**In-service candidate will also be covered by relevant general eligibility criteria**.

8.3 **Non-eligibility of Candidate.** The following candidates are not eligible for admission process through NEET-PG 2019.

8.17.1 Candidates who have passed Final MBBS examination from institute located outside Maharashtra, except candidates who are Domicile of Maharashtra and selected under 15% all India quota / AIIMS / Central Government Institution (Ref. Rule 8.3).

वरील तरतुदीमध्ये **Annexure "U"** चा उल्लेख केलेला आहे. त्या परिशिष्ठामध्ये सुध्दा वैद्यकीय पदवी विदेशी विद्यापीठाकडून पदवी प्राप्त केलेल्या उमेदवारांना पात्र समजावे अशी कोणतीही तरतुद आढळून आली नाही.

त्यानुषंगाने सार्वजनिक आरोग्य सेवा विभागात नियमित सेवा करणाऱ्या व वैद्यकीय पदवी विदेशी विद्यापीठातून पूर्ण करणाऱ्या उमेदवारांने नीट पीजी - २०१९ या केंद्रिय प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज सादर करताना कागदपत्र पडताळणीच्या वेळेस संचालक, आरोग्य सेवा संचालनालय यांचे प्रमाणपत्र सादर करण्याच्या हमीपत्राच्या अटीवर अर्ज भरण्यास परवानगी देण्यात येत आहे. तसेच सदर उमेदवार संचालक, आरोग्य सेवा संचालनालय यांचे प्रमाणपत्र, मुळ प्रमाणपत्र व दस्ताऐवज प्रत्यक्ष पडताळणीच्या वेळेस सादर करेल.

वरील बाबींच्या अनुषंगाने नीट पीजी - २०१९ पदव्युत्तर पदवी प्रवेशाच्या माहिती पुस्तिकेत योग्य ते बदल करण्याच्या सूचना संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना निर्गमित कराव्यात, अशी विनंती आहे.

आपला विश्वासू,

सही/-
(आनंद ए. रायते), भाप्रसे
आयुक्त,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

सोबत - संदर्भ क्र. १ व २ आणि माहिती पुस्तिकेचे
संदर्भीय पृष्ठ व परिशिष्ट - "U"

प्रत -

१) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

२) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई

महाराष्ट्र शासन

# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१
दुरध्वनी:+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२२५१/५७/५९. टेलीग्राम: "MEDUCATNSEARCH" फॅक्स:+९१-२२-२२६२०५६२/२२६५२१६८
संकेतस्थळ: http://www.dmer.org

क्र. संवैशिवसं/आसेसंमुं/नीट-पीजी १९/सेवांतर्गत/पात्रता/२-अ, दिनांक ०१/०३/२०१९

प्रति,
मा. आयुक्त,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
०८ वा मजला, न्यु एक्सलसिअर इमारत,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई ४०० ००१.

**विषय -** **सार्वजनिक आरोग्य विभागात विदेशातील पदवी धारक वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवांतर्गत नीट पीजी प्रवेशाबाबत....**

**संदर्भ -** **सहसंचालक (अवप्र), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. संआसे/ पीजी सेल/ सेवांतर्गत / पीजी / विदेश पदवी अर्ज स्विकार/३७४९/१९, दिनांक २८/०२/२०१९**

सहसंचालक (अवप्र), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांच्या संदर्भाधिन प्रत्राची प्रत सहपत्रांसह सोबत सादर करण्यात येत आहे.

सदरील पत्रान्वये त्यांनी दिनांक ०३ मे २०११ च्या शासन निर्णयानुसार सार्वजनिक आरोग्य विभागातील सेवांतर्गत वैद्यकीय अधिकाऱ्यांना ०३ वर्ष स्थायी सेवा (नियमीत) पूर्ण झालेली असल्यास सेवांतर्गत कोटयातून पात्र करण्यात येत असल्याचे नमुद केले आहे. तसेच सेवांतर्गत उमेदवारांपैकी काही उमेदवारांचे अर्ज नीट पीजी २०१९ च्या नोंदणीच्या संकेतस्थळावर त्यांची पदवी विदेशी विद्यापीठाची असल्याने स्विकारण्यात येत नसल्याचे नमुद केले आहे. तरी सदरील उमेदवार हे सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत नियमीत सेवा करीत असून ते शासन नियमानुसार सेवांतर्गत कोटयासाठी पात्र असल्याचे नमुद केले आहे.

उपरोक्त विषयानुषंगाने आपणास विनंती करण्यात येते की, आरोग्य सेवा संचालनालयाने नमुद केल्यानुसार सदरील सेवांतर्गत पात्र उमेदवारांना नीट पीजी २०१९ च्या नोंदणी प्रक्रियेत तसेच पुढील सर्व प्रक्रियांसाठी पात्र करण्याबाबत आवश्यकती कार्यवाही करावी.

**संचालक**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
०१) मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, ०९ वा मजला, गो. ते. रुग्णालय संकुल, गो.ते. रुग्णालय आवार, मुंबई ४०० ००१.
०२) सहसंचालक (अवप्र), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना त्यांच्या संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने माहितीसाठी.

NEET PG_Inservice_CET Cell_2019

Scanned by CamScanner

टिपणीस मान्यते नुसार.


**आरोग्य सेवा संचालनालय (महाराष्ट्र राज्य)**

" आरोग्य भवन ", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४०० ००१

| | दूरध्वनी | |
|---|---|---|
| कार्यालय | २२६२१०३१-३६ | Website : http://maha-arogya.gov.in<br>Email : dhsdesk5@yahoo.com |
| संचालक (वैयक्तिक) | २२६२१००६ | Email : miscell@rediffmail.com |
| सहसंचालक (खरेदी कक्ष) | २२६२६२८२ | Fax No. 022-22621034 / 22620234 (DHS) |
| सहसंचालक (अर्थ व आस्थापना) | २२६२६७५५ | 022-22622155(CAO) |


**राज्य सीईटी कक्ष, मुंबई**
आवक क्रमांक
दिनांक
शाखा
प्र.अ. आयुक्त

जा.क्र.संआसे/पी.जी.सेल/सेवांतर्गतपीजी/विदेश पदवी अर्ज स्विकार/१९
दिनांक - २८ फेब्रुवारी २०१९

Dr. Pudge Pl call for explaination from DMER

प्रति,
मा. संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,
(पीजी सेल) मुंबई.

**विषयः- सार्वजनिक आरोग्य विभागात विदेशातील पदवी धारक वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवांतर्गत नीट पी जी प्रवेशाबाबत.**

**संदर्भ :- १) शासन निर्णय दिनांक ३ मे २०११.**
**२)नीट पी जी २०१९ परिक्षा पात्र विद्यार्थी डॉ.नौकरकर डॉ.इंगोले , डॉ.काळे व व डोंगरे यांचा दि.२८.२.२०१९ चा विनंती अर्ज.**

उपरोक्त विषयाबाबत संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयानुसार सार्वजनिक आरोग्य विभागात सेवांतर्गत वैद्यकीय अधिकाऱ्यांना ३ वर्ष स्थायी (नियमित) सेवा पुर्ण झालेली आहे अशा वैद्यकीय अधिकाऱ्याना सेवांतर्गत परिक्षेसाठी पात्र समजण्यात येतात.

सार्वजनिक आरोग्य विभागात सेवांतर्गत जे वैद्यकीय अधिकारी नीट पी जी २०१९ मध्ये पदवी/पदविका अभ्यासक्रमासाठी पात्र ठरलेले आहे. अशा वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवांतर्गत परिक्षा देण्यासाठी परवानगी दिलेली आहे.

सद्यस्थितीत नीट पीजी २०१९ परिक्षेमध्ये उत्तीर्ण उमेद्वाराचे आपल्या कार्यालयाकडे रजिस्ट्रेशन करण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर करतांना सदर वैद्यकीय अधिकारी यांनी विदेशी एम बी बी एस पदवी घेतलेली असल्याने, त्यांचे ऑनलाईन फॉर्म अपात्र दर्शविण्यात येतात. सदरच्या विदेश पदवी धारण केलेल्या व नीट पी.जी. २०१९ मध्ये पात्र असलेल्या वैद्यकीय अधिकारी यांचे ऑनलाईन अर्ज स्विकारण्यात यावेत याबाबत आपल्या स्तरावरुन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी ही विनंती.

(संजय पंतंगे)
सहसंचालक (अ व प्र)
संचालनालय आरोग्य सेवा,मुंबई.

प्रत माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सविनय सादर.
**/-मा.आयुक्त स्टेट कॉमन इंट्रन्स टेस्ट सेल मुंबई.१**
Pg tippni letter

Scanned by CamScanner